# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.02.2025** **वार-सोमवार**

---

**<u>जीबीएस</u>**

राज्यात गुलेन बॅरी सिंड्रोम या आजाराने गेल्या काही दिवसांत चिंतेचं वातावरण निर्माण केले होतं, मात्र आता परिस्थिती सुधारत आहे. या आजारचे अनेक रुग्ण बरे होत आहेत, 38 रुग्णांना उपचारानंतर रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं. दररोज रुग्णसंख्येमध्ये नऊ ते दहा रुग्णांची वाढ होत असली तरी रुग्ण बरे होण्याचं प्रमाणही वाढत आहे. जीवरक्षक प्रणालीवर असलेल्या रुग्णांची संख्याही 28वरून 21पर्यंत घटली आहे. 48 रुग्ण अतिदक्षता विभागात उपचार घेत आहेत. आज जीबीएस आजाराच्या नवीन नऊ रुग्णांची नोंद झाली आहे. आता एकंदर रुग्णसंख्या 158 झाली. यापैकी 83 रुग्ण पुणे महापालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधले आहेत. उर्वरित 31 रुग्ण पुणे महापालिका, 18 पिंपरी चिंचवड महापालिका, तर 18 रुग्ण पुण्याच्या ग्रामीण भागामधील आहेत. इतर जिल्ह्यांमधील रुग्णसंख्या आठ आहे. या आजाराच्या पार्श्वभूमीवर पुणे शहर आणि जिल्ह्यातील एकंदर 64 हजार 567 घरांचं सर्वेक्षण आता पर्यंत करण्यात आलं आहे.

**<u>हिपॅटायटिसबी</u>**

पुणे शहरातील खासगी रुग्णालयांमध्ये हिपॅटायटिस बी लसीचा तुटवडा निर्माण झाला आहे. नवजात बालकांना हिपॅटायटिस बी लस द्यावी लागते. महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये बालकांना देण्यासाठी या लसीचा पुरेसा साठा आहे. त्यातून बालकांचं नियमित लसीकरण सुरू आहे. खासगी रुग्णालयांत जन्म झालेल्या बालकांनाही महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये ही लस उपलब्ध करून दिली जात आहे, अशी माहिती महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. राजेश दिघे यांनी दिली आहे.

**<u>चंद्रकांतपाटील</u>**

भूसंपादनाच्या कारणास्तव रखडलेले रस्ते पूर्ण झाल्यानंतर पुण्यातील वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागेल; त्याकरता रस्त्यांच्या मिसिंग लिंक जोडण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या निधीपैकी पन्नास टक्के

निधी राज्य सरकारने द्यावा, यासाठी आपण लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार आहोत, अशी माहिती मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली. कोथरूड मतदार संघातील विविध प्रश्नांसंदर्भात  पाटील यांनी आज महापालिकेत बैठक घेतली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. एकीकडे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा हवा तेव्हढा वापर होत नाही. तर दुसरीकडे अनेक ठिकाणचे रस्ते, जागामालक महापालिकेला देत नाहीत म्हणून मिसिंग लिंक तयार झाल्या आहेत. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार ३१ मिसिंग लिंक अशा आहेत, त्या पूर्ण केल्या तर वाहतुकीचा प्रश्न सुटेल. या मिसिंग लिंकसाठी साधारण आठशे कोटी रुपयांची आवश्यकता आहे, असं पाटील यांनी सांगितलं.

**<u>रोलबॉल</u>**

रोल बॉल या खेळाला महाराष्ट्र शासनाची मान्यता आहे परंतु हा खेळ छत्रपती पुरस्काराच्या यादीमध्ये नाही, तसंच ५ टक्के आरक्षण यादीमध्ये देखील या खेळाचा समावेश नाही, ह्या दोन्ही गोष्टी घडाव्यात यासाठी प्रयत्न करणार असल्याचं आश्वासन मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिलं आहे. रोलबॉल ह्या खेळाच्या बावीसाव्या वर्धापनदिना निमित्त पाटील यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पदक विजेत्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. ह्या खेळाचे जनक राजू दाभाडे कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<u>कारागृह</u>**

कारागृहातील गुन्हेगाराला जामीन मिळवून देण्यासाठी बनावट जामीनदार आणि कागदपत्र तयार करण्याचं कारस्थान पुणे पोलिसांनी उघड केलं आहे. या प्रकरणी २ वकिलांसह ११ जणांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यात वकिलांबरोबर न्यायालयातील कर्मचाऱ्यांचाही सहभाग असल्याचं आढळून आलं आहे. पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. वानवडी पोलीस ठाण्यातील तपास पथकाला या प्रकरणाचा सुगावा लागल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली.

**<u>मोबाईलटॉयलेट</u>**

पुणे महापालिकेने शहरातील गर्दीच्या अकरा ठिकाणी पीएमपीएमएलच्या जुन्या बसेसचा वापर करून महिलांसाठी मोबाईल टॉयलेट सुरू केली होती. यापैकी सध्या केवळ तीनच बसचा वापर सुरू आहे. ही बंद पडलेली उर्वरित मोबाईल टॉयलेट आता सुरू करण्यात येणार आहेत. या सेवेसाठी पाच रुपये शुल्क आकारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

**<u>इंदोर</u>**

कसबा विधानसभा मतदारसंघात स्वच्छ सुंदर आणि विकसित कसबा अभियान राबवण्यात येत आहे. या अंतर्गत स्वच्छता दूतांसाठी अभ्यास दौराही आयोजित करण्यात आला आहे. स्वच्छ सर्वेक्षणात गेल्या सात वर्षापासून पहिल्या क्रमांकावर असणाऱ्या इंदोर शहराच्या या अभ्यास दौऱ्यात 100पेक्षा जास्त स्वच्छता कर्मचाऱ्यांचा समावेश असेल अशी माहिती आमदार हेमंत रासने यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल तापमान ३५ अंश तर किमान तापमान 16 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल आणि दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार**.